ePaper

# युक्रेनच्या राष्ट्राध्यक्षांनी संरक्षण मंत्र्यांना का हटवले?



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 18 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

कामात हलगर्जीपणा केलात, तर सुट्टी नाही!

## बलुचिस्तान लिबरेशन आर्मीचा पाकिस्तानी लष्करावर हल्ला

# ४५ पाकिस्तानी सैनिक ठार



महाईन्यूज । नवी दिल्ली

**पाकिस्तानमध्ये सुरक्षा परिस्थिती पुन्हा एकदा गंभीर बनली असून, बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए)ने मस्तुंग जिल्ह्यात पाकिस्तानी लष्कराच्या ताफ्यावर मोठा हल्ला केल्याचा दावा केला आहे. या हल्ल्यात ४५ पाकिस्तानी जवान ठार झाल्याचा दावा बीएलएने केला असून, अनेक सैनिक जखमी झाल्याचेही म्हटले आहे. मात्र, पाकिस्तानी लष्कराने हल्ल्याची पुष्टी केली असली तरी मृतांचा अधिकृत आकडा जाहीर केलेला नाही.**

### पाकिस्तानचा इशारा

पाकिस्तान "ऑपरेशन शाबाण" राबविण्यासाठी लष्कर, फ्रंटीयर कॉर्प्स, बलुचिस्तान पोलिस, हवाई दल आणि गुप्तचर यंत्रणांची देखील मदत घेत आहे. पाकिस्तानी लष्कराचे प्रवक्ते ले. जनरल शरीफ चौधरी यांनी या हल्ल्याप्रकरणी इशारा देताना, जे कोणी जबाबदार असतील त्यांना शोधून ठार केले जाईल, असा इशारा दिला आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी बलुचिस्तानने आपण स्वतंत्र देश असल्याचे जाहीर करताना, पाकिस्तानपासून वेगळं झाल्याचे म्हटले होते. याप्रकरणी व्हायरल झालेल्या एका निवेदनात बलुचिस्तान वेगळा देश असल्याचा दावा करण्यात आला होता.

पाकिस्तानमध्ये सुरक्षा परिस्थिती पुन्हा एकदा गंभीर बनली असून, बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए)ने मस्तुंग जिल्ह्यात पाकिस्तानी लष्कराच्या ताफ्यावर मोठा हल्ला केल्याचा दावा केला आहे. या हल्ल्यात ४५ पाकिस्तानी जवान ठार झाल्याचा दावा बीएलएने केला असून, अनेक सैनिक जखमी झाल्याचेही म्हटले आहे. मात्र, पाकिस्तानी लष्कराने हल्ल्याची पुष्टी केली असली तरी मृतांचा अधिकृत आकडा जाहीर केलेला नाही.

हा हल्ला गुरुवारी क्वेटा-कराची महामार्गावरील खडकुचा परिसरात झाला. जवानांना घेऊन जाणाऱ्या ताफ्याला लक्ष्य करत सशस्त्र हल्ला करण्यात आला. बीएलएच्या म्हणण्यानुसार, ताफ्यासोबत असलेल्या सुरक्षा पथकावर तसेच घटनास्थळी मदतीसाठी पोहोचलेल्या लष्करी तुकड्यांवरही हल्ला करण्यात आला.

बीएलएचे प्रवक्ते झियांद बलोच यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात हा हल्ला 'फतेह स्क्वॉड'ने सुनियोजित पद्धतीने केल्याचा दावा करण्यात आला आहे. निवेदन जारी करण्यात आले, त्यावेळीही पाकिस्तानी लष्करासोबत चकमक सुरू असल्याचे सांगण्यात आले असून, मृतांचा आकडा आणखी वाढू शकतो, असेही नमूद करण्यात आले आहे. लढाई संपल्यानंतर सविस्तर निवेदन प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे बीएलएने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याबाबतही बीएलएकडून मोठा दावा करण्यात आला आहे. संघटनेने बलुचिस्तानला 'बलुचिस्तान प्रजासत्ताक' म्हणून स्वतंत्र देश घोषित केल्याचा दावा केला असून, ८५ टक्के भूभागावर नियंत्रण असल्याचे म्हटले आहे.





तसेच स्वतंत्र ध्वज, राष्ट्रगीत, चलन आणि प्रशासकीय व्यवस्था लागू करण्याचाही दावा करण्यात आला आहे. या दाव्याला पाकिस्तान सरकारकडून अधिकृत मान्यता किंवा पुष्टी मिळालेली नाही.

एकीकडे पाकव्याप्त काश्मीरमध्ये सुरू असलेले आंदोलन आणि दुसरीकडे बलुचिस्तानमधील वाढती हिंसा यामुळे पाकिस्तान सरकार आणि लष्करासमोर अंतर्गत सुरक्षेचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

### पाकिस्तानकडूनही ऑपरेशन सुरु

जीयांद बलोच यांनी पत्रकात पुढे म्हटल्याप्रमाणे हा बीएलएच्या फतेह ग्रुपने हा हल्ला केला, हा हल्ला संयुक्तपणे करण्यात आल्याचेही त्यांनी म्हटले आहे. पत्रक प्रसिद्ध केले त्यावेळी देखील चकमक सुरु होती आणि मृतांची संख्या वाढण्याची शक्यता बलोच यांनी वर्तवली. पाकिस्तानी पोलिस आणि जवानांवर हल्ल्याच्या वाढत्या घटना लक्षात घेता, पाकिस्तानी लष्कराने "ऑपरेशन शाबाण" सुरु केले आहे. मांगी धरण परिसरात झालेल्या हल्ल्यात २७ पोलिस आणि लासबेला येथे झालेल्या हल्ल्यात ११ पाकिस्तानी जवानांचा मृत्यू झाला होता. यानंतर पाकिस्तानकडून खबरदारी घेतली जात आहे.

# पुणे-सोलापूर प्रवास वेगवान!

## देशातील दुसऱ्या क्रमांकाचा उन्नत महामार्गाची उभारणी करणार

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे-सोलापूर महामार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. ही कोंडी सोडविण्यासाठी उन्नत महामार्ग उभारण्याचे पाऊल उचलण्यात आले आहे. हा लांबीच्या बाबतीत देशातील दुसऱ्या क्रमांकाचा उन्नत महामार्ग ठरणार आहे. या महामार्गामुळे मांजरी फाटा, लोणी काळभोर, थेऊर फाटा आणि उरूळी कांचन येथील वाहतूक कोंडीची समस्या सुटणार आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाकडून या महामार्गाची उभारणी केली जाणार आहे.**



पुणे-सोलापूर महामार्गावर हडपसर ते यवतदरम्यान महामार्गाच्या विस्तारीकरणासह उन्नत महामार्ग उभारण्यात येणार आहे. हा सध्या चौपदरी महामार्ग आहे. हा मार्ग सहापदरी केला जाणार असून, त्यावर सहापदरी उन्नत महामार्ग बांधण्यात येणार आहे. हा उन्नत महामार्ग देशातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक लांबीचा सहापदरी उन्नत महामार्ग असेल. या महामार्गाची लांबी ३१.५० किलोमीटर असेल. या प्रकल्पासाठी ४७.२५ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनाची आवश्यकता असेल. या प्रकल्पामुळे पुणे-सोलापूर महामार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या कमी होणार आहे. या महामार्गावर मांजरी फाटा, कदमवाक वस्ती, लोणी काळभोर आणि थेऊर फाटा आणि उरूळी कांचन ही कोंडीची अनेक ठिकाणे आहेत. या प्रकल्पामुळे येथील कोंडीतून वाहनचालकांची सुटका होणार आहे.

या महामार्गाची क्षमता प्रतिदिन ३० हजार प्रवासी वाहने आहे. या महामार्गावरील सध्याची वाहतूक प्रतिदिन ४३ हजार ६४० प्रवासी वाहन आहे. भविष्यात या महामार्गाची क्षमता १ लाख ६ हजार प्रवासी वाहनांवर जाणार आहे. या प्रकल्पात हडपसर ते सहजपूरवाडी असा २५ किलोमीटर उन्नत सहापदरी महामार्ग असेल. याचबरोबर हडपसर ते यवत असा ३१.५० किलोमीटर सहापदरी जमिनीवरील महामार्ग असेल. याचबरोबर हडपसर ते बाह्य वर्तुळाकार मार्ग ही १७.६७ किलोमीटरची मेट्रो मार्गिका असेल. या प्रकल्पाची वैशिष्ट्ये म्हणजे हडपसर ते यवत दरम्यान ३१.५० कि.मी. लांबीच्या या प्रकल्पात २५ कि.मी.चा सहापदरी उन्नत महामार्ग उभारण्यात येणार असून, यासाठी ५,२६२ कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे.


### देशातील उन्नत महामार्ग

पुण्याच्या परिसरात वाहतूक कोंडीची समस्या बिकट बनली आहे. यातून केवळ वाहनचालकांचा वेळ वाया जात नाही, तर त्याचा गंभीर आर्थिक परिणाम पुण्याच्या विकासावर होत आहे. नवीन प्रकल्पांमुळे पुण्याच्या परिसरातील कोंडी सुटून आर्थिक विकासाला गती मिळणार आहे. यामुळे गुंतवणुकीच्या नवनवीन संधी निर्माण होणार आहेत. देशातील सर्वाधिक लांबीचा पहिला आणि दुसरा सहापदरी उन्नत महामार्ग पुण्यात उभारण्यात येणार आहे. त्यात पुणे ते शिरूर उन्नत द्रुतगती महामार्ग आणि हडपसर ते यवत उन्नत मार्गाचा समावेश आहे.

## कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या जमिनींच्या सातबारा नोंदींना वेग

**महाईन्यूज । पुणे**

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अखत्यारित सुमारे दोन लाख हेक्टर जमीन असून, त्यापैकी तब्बल 80 टक्के जमीन धरणांच्या पाणीसाठ्याखाली बुडीत क्षेत्रात आहे. त्यामुळे उर्वरित सुमारे 20 हजार हेक्टर बुडीत क्षेत्राबाहेरील जमिनींच्या सातबारा उताऱ्यांवर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे नाव नोंदविण्याची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहे.**



या मोहिमेत आतापर्यंत एकूण 5 हजार 700 हेक्टर जमिनींच्या सातबारा उताऱ्यावर 'महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ' अशी नोंद करण्यात आली असून, उर्वरित क्षेत्राची प्रक्रिया जिल्हाधिकारी, मंडल अधिकारी आणि तलाठी यांच्या समन्वयातून वेगाने सुरू आहे.

राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निर्देशानंतर नोव्हेंबर 2025 पासून ही विशेष मोहीम सुरू करण्यात आली. अनेक वर्षांपासून विविध नावांनी असलेल्या नोंदी एकसंध करून सर्व जमिनींच्या सातबारा उताऱ्यावर केवळ महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ हेच नाव नोंदविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या दोन मुख्य अभियंत्यांच्या अखत्यारित 10 मंडळे महामंडळाच्या कामकाजासाठी मुख्य अभियंता (जलसंपदा) आणि मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) अशा दोन स्वतंत्र शाखा कार्यरत आहेत. या दोन्ही शाखांच्या अंतर्गत मिळून 10 मंडळे कार्यरत असून, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये महामंडळाच्या विविध प्रकल्पांचा कारभार चालतो.याच दोन्ही विभागांच्या अखत्यारितील बुडीत क्षेत्राबाहेरील जमिनींच्या सातबारा नोंदींचे एकत्रित काम सुरू आहे.

कृष्णा खोरे विकास महामडळाच्या मुख्य अभियंता (जलसंपदा) यांच्या अखत्यारितील पाच मंडळांमध्ये धरणांच्या बुडीत क्षेत्राबाहेरील 9 हजार 700 हेक्टर जमीन आहे. या जमिनींपैकी 3 हजार 600 हेक्टर क्षेत्राच्या सातबारा उताऱ्यावर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे नाव नोंदविण्यात आले आहे. यापूर्वी जलसंपदा विभागाच्या जमिनींच्या सातबारा उताऱ्यावर पाटबंधारे, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र शासन अशा विविध स्वरूपातील नोंदी होत्या.

### पाच मंडळे कार्यरत

उर्वरित क्षेत्राच्या सातबारा नोंदींचे काम प्रगतीपथावर असून, महसूल प्रशासनाच्या सहकार्याने ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.तर मुख्य अभियंता विशेष प्रकल्प विभागात पुणे, सोलापूर, सातारा आणि धाराशिव जिल्ह्यांतील पाच मंडळे कार्यरत आहेत. या विभागाकडे धरणांच्या बुडीत क्षेत्राबाहेरील 3 हजार 800 हेक्टर जमीन आहे. त्यापैकी 2 हजार 100 हेक्टर जमिनींच्या सातबारा उतार्‍यावर महामंडळाचे नाव नोंदविण्यात आले असून, उर्वरित जमिनींच्या नोंदींसाठी कार्यवाही सुरू आहे.

# कामात हलगर्जीपणा केलात, तर सुट्टी नाही!

## आमदार शंकर जगताप यांचा महावितरणला 'डोस'; समन्वयाशिवाय कामांना बंदी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मागील आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे रावेत, किवळे आणि मामुर्डी परिसरातील नागरिकांना तब्बल ४८ तास वीजविना राहावे लागल्याच्या घटनेची गंभीर दखल घेत चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी महावितरण आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची संयुक्त आढावा बैठक घेतली. यावेळी अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणावर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत, "कामात हलगर्जीपणा केलात तर सुट्टी नाही; नागरिकांचा त्रास सहन केला जाणार नाही," असा स्पष्ट इशारा दिला.**



मुसळधार पावसामुळे अनेक भागातील वीजपुरवठा खंडित झाला होता. विशेषतः रावेत, किवळे आणि मामुर्डी परिसरात तब्बल दोन दिवस वीज नसल्याने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले. सोसायट्यांमधील पाणी उपसा यंत्रणा बंद पडल्यामुळे पिण्याच्या पाण्यासह दैनंदिन गरजांसाठीही नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

बैठकीत झालेल्या चर्चेदरम्यान महापालिका किंवा खासगी कंत्राटदारांकडून समन्वयाशिवाय करण्यात आलेल्या रस्ते खोदाईमुळे महावितरणच्या भूमिगत वीजवाहिन्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे समोर आले. याच निष्काळजीपणामुळे दीर्घकाळ वीजपुरवठा खंडित झाल्याचेही स्पष्ट झाले.

यावर आमदार जगताप यांनी संबंधित अधिकाऱ्यांना फटकारत भविष्यात महावितरणशी समन्वय साधल्याशिवाय कोणत्याही प्रकारची खोदाईची कामे सुरू करू नयेत, असे स्पष्ट निर्देश दिले. तसेच शहरातील धोकादायक वीज वितरण केंद्रे (डीपी) आणि विद्युत यंत्रणेची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करण्याचे आदेशही दिले.

यावेळी नागरिकांना पुन्हा अशा परिस्थितीला सामोरे जावे लागू नये, यासाठी बैठकीत ठरविण्यात आलेल्या सर्व उपाययोजनांची वेळेत आणि काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

दरम्यान, भविष्यातील वाढती वीज मागणी लक्षात घेऊन गहुंजे येथे २२०/२२ केव्ही, ३०० एमव्हीए क्षमतेचे नवीन महापारेषण उपकेंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पामुळे रावेत, किवळे, मामुर्डी आणि परिसरातील वीजपुरवठा अधिक सक्षम व अखंड राहण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पाला गती देण्यासाठी पुढील आठवड्यात महापारेषण, महावितरण आणि संबंधित विभागांची संयुक्त बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

बैठकीस नगरसेवक धर्मपाल तंतरपाळे, कुणाल वाव्हळकर, रावेत-वाल्हेकरवाडी अध्यक्ष मोहन राऊत, श्रीकांत भोंडवे, दीपक भोंडवे यांच्यासह महावितरणचे उपअभियंता रत्नदीप काळे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता कल्याण गिरी, अधीक्षक अभियंता मुंडे, लहाने, सुरेश गवारे, आशुतोष थोरात आदी अधिकारी उपस्थित होते.

### 'नागरिकांचा त्रास सहन केला जाणार नाही'

रावेत, किवळे आणि मामुर्डीतील ४८ तासांच्या वीजखंडितीची गंभीर दखल घेत आमदार शंकर जगताप यांनी महावितरण व महापालिका अधिकाऱ्यांना समन्वयाशिवाय खोदाई न करण्याचे, धोकादायक डीपी तातडीने दुरुस्त करण्याचे आणि भविष्यात अशी परिस्थिती निर्माण झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. भविष्यात अखंड वीजपुरवठ्यासाठी गहुंजे येथे नवीन महापारेषण उपकेंद्र उभारण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

# सारिका गायकवाड यांचा पहिलाच निर्णय ठरला संवेदनशील



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीच्या सभापतीपदी नगरसेविका तथा स्थायी समिती सदस्या सौ. सारिका रवींद्र गायकवाड यांची गुरुवारी एक दिवसासाठी निवड करण्यात आली. स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी त्यांच्याकडे एक दिवसासाठी सभापतीपदाचा पदभार सोपविला.**

### 'कष्टकरी बांधवांना विनम्र अभिवादन'

मोशी दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ स्थायी समितीची सभा तहकूब करून त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पीडित कुटुंबांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

सभापतीपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर सारिका गायकवाड यांनी संवेदनशीलतेचे दर्शन घडवत, मोशी येथील कचरा डेपो परिसरात झालेल्या दुर्दैवी दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या कामगार बंधूंच्या स्मरणार्थ श्रद्धांजली अर्पण केली. तसेच, त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत स्थायी समितीची सभा तहकूब करण्याचा निर्णय घेतला.

या प्रसंगी उपस्थित सदस्यांनीही दिवंगत कामगारांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. मोशी दुर्घटनेमुळे संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहर हळहळ व्यक्त करत असताना, स्थायी समितीच्या सभागृहातून मृत कामगारांप्रती व्यक्त करण्यात आलेली ही संवेदना महत्त्वाची मानली जात आहे.

सारिका गायकवाड यांनी यावेळी, "मोशी दुर्घटनेत आपण शहरातील कष्टकरी कामगार बांधवांना गमावले आहे. त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आजची सभा तहकूब करून आपण त्यांना आदरांजली अर्पण करीत आहोत," अशा भावना व्यक्त केल्या. तसेच, आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही पीडित कुटुंबियांना सर्वोतोपरी आधार देणार आहोत, अशी ग्वाही दिली.

दरम्यान, एक दिवसासाठी स्थायी समितीच्या सभापतीपदाची जबाबदारी स्वीकारण्याचा मान मिळाल्याबद्दल सारिका गायकवाड यांनी सभापती अभिषेक बारणे तसेच महापालिका प्रशासनाचे आभार मानले.

> "मोशी दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या कष्टकरी कामगार बांधवांना श्रद्धांजली अर्पण करणे, ही आपली नैतिक जबाबदारी आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहर सहभागी आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आजची स्थायी समिती सभा तहकूब करून आपण त्यांना विनम्र अभिवादन करत आहोत. ईश्वर दिवंगत आत्म्यांना चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो."
>
> **- सारिका रवींद्र गायकवाड,** नगरसेविका तथा एक दिवसीय स्थायी समिती सभापती.



## भूमिका

# महायुतीचे वाढते वर्चस्व; विरोधकांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह




**महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या अभूतपूर्व घडामोडी घडत आहेत. महायुतीचे संख्याबळ सातत्याने वाढत असताना विरोधी पक्षांतील नेत्यांचे स्थलांतरही वेगाने सुरू आहे. त्यामुळे विधानसभेत प्रभावी विरोधी पक्ष उरेल का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. लोकशाहीत सत्तेसोबत सक्षम विरोधकही तितकेच आवश्यक असतात.**

मात्र आज विरोधी पक्षांची संघटनात्मक कमकुवतता आणि नेतृत्वावरील प्रश्नांमुळे ही समतोल व्यवस्था ढासळताना दिसत आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूटीनंतर महाविकास आघाडीची ताकद मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. आता शरद पवार गटातील काही आमदार आणि नेतेही सत्ताधारी आघाडीकडे झुकत असल्याच्या चर्चांमुळे विरोधी बाकांवरील संख्याबळ आणखी घटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दुसरीकडे महायुतीचे संख्याबळ विक्रमी पातळीवर पोहोचण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. संख्येच्या बळावर सरकार अधिक स्थिर होऊ शकते; मात्र लोकशाही केवळ बहुमतावर चालत नाही. विरोधक सत्तेच्या निर्णयांची चिकित्सा करतात, चुका दाखवून देतात आणि जनतेच्या प्रश्नांना आवाज देतात. विरोधी पक्ष कमकुवत झाला तर सत्तेवरील नैसर्गिक नियंत्रणही कमी होण्याचा धोका असतो. त्यामुळे विरोधी बाके रिकामी होणे ही कोणत्याही लोकशाहीसाठी चिंतेची बाब मानली जाते.

याच वेळी विरोधकांसाठी ही आत्मपरीक्षणाची संधीही आहे. केवळ सत्ताधाऱ्यांवर टीका करून जनतेचा विश्वास मिळत नाही. मजबूत संघटन, स्पष्ट नेतृत्व, सातत्यपूर्ण जनसंपर्क आणि कार्यकर्त्यांशी संवाद यांची उभारणी करावी लागते. भारतीय जनता पक्षाने याच बाबींवर सातत्याने भर देत संघटनशक्ती वाढविली आहे.

कार्यकर्त्यांना जबाबदाऱ्या देणे, नियमित आढावा घेणे आणि प्रत्येक स्तरावर सक्रियता राखणे, ही त्यांची कार्यपद्धती इतर पक्षांसाठी अभ्यासाचा विषय ठरू शकते.

काँग्रेससह विरोधी पक्षांनी परंपरागत मतदारांचा विश्वास पुन्हा मिळविण्यासाठी नव्या पद्धतीने काम करण्याची गरज आहे. जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने लढा उभारणे, सक्षम पर्यायी नेतृत्व निर्माण करणे आणि अंतर्गत मतभेदांवर मात करणे, ही काळाची गरज आहे. अन्यथा विरोधी पक्षांची जागा आणखी संकुचित होईल. लोकशाहीची खरी ताकद सत्ताधाऱ्यांच्या संख्येत नसून सत्तेला निर्भयपणे प्रश्न विचारणाऱ्या विरोधकांत असते. मजबूत सरकार जितके आवश्यक आहे, तितकाच सक्षम विरोधी पक्षही आवश्यक आहे.

महाराष्ट्रात सध्या विरोधकांची अवस्था बिकट असली तरी इतिहास सांगतो की राजकारणात परिस्थिती कायमस्वरूपी नसते. आजची अडचण उद्याची संधी ठरू शकते. मात्र त्यासाठी विरोधकांनी आत्मपरीक्षण, संघटनबांधणी आणि जनविश्वास पुनर्स्थापित करण्याची तयारी दाखविणे गरजेचे आहे. तेव्हाच लोकशाहीचा समतोल अबाधित राहील.

## प्रासंगिक »

### मन करा रे प्रसन्न!

**विश्वनाथरावांना तीन मुलगे, तर त्यांचे भाऊ जयंतरावांना तीन मुली होत्या. मुलींच्या लग्नाचा खर्च करावा लागतो, म्हणून तीन मुलगे असल्याचा विश्वनाथरावांना मोठा अभिमान होता.**

ते नेहमी आपल्या नशिबाची स्तुती करत असत. काळ पुढे सरकत गेला. मुलगे मोठे झाल्यावर ते आपल्या संसारात रमले आणि वडिलांकडे दुर्लक्ष करू लागले. त्यामुळे विश्वनाथराव एकाकी झाले.

दुसरीकडे, जयंतरावांनी कधीही मुली असल्याचे दुःख मानले नाही. "परमेश्वर सर्वांची काळजी घेतो," या विश्वासाने त्यांनी पत्नीसमवेत कष्ट करून मुलींना चांगले संस्कार दिले आणि त्यांचे संसारही सुखाचे झाले. मुली सतत आई-वडिलांची विचारपूस करत राहिल्या. त्यामुळे जयंतरावांचे घर नेहमी आनंदी आणि समाधानाने भरलेले राहिले.

- तात्पर्य : **खरे सुख संपत्तीत किंवा मुलगा-मुलगी यांत नसते; ते प्रसन्न, समाधानी आणि अहंकारमुक्त मनात असते. अहंकार माणसाला दुःखाकडे नेतो, तर सकारात्मक विचार आणि समाधान जीवन आनंदी बनवतात.**

मुंबईची 'बेस्ट' सेवा ही केवळ सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नव्हे, तर शहराच्या शिस्तबद्ध नागरी संस्कृतीचे प्रतीक होती. शंभर वर्षांचा इतिहास लाभलेल्या या सेवेने लाखो मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाला आधार दिला.

# 'बेस्ट'ची घसरती वाटचाल




मात्र शताब्दी वर्ष साजरे करताना 'बेस्ट'च्या गौरवशाली परंपरेपेक्षा तिची ढासळलेली अवस्था अधिक चर्चेत आहे. ही परिस्थिती केवळ एका संस्थेची नव्हे, तर आपल्या शहर नियोजनातील त्रुटींचे प्रतिबिंब आहे. १९२६ मध्ये अवघ्या २४ बसगाड्यांपासून सुरू झालेली 'बेस्ट' सेवा पुढे हजारो बसांच्या ताफ्यापर्यंत पोहोचली. सुरक्षित, वेळेवर आणि विश्वासार्ह सेवा हे तिचे वैशिष्ट्य होते.

मात्र आज संस्थेच्या स्वतःच्या मालकीच्या बसगाड्यांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली असून कंत्राटी व्यवस्थेवर अवलंबित्व वाढले आहे. यामुळे सेवेची गुणवत्ता, देखभाल आणि उत्तरदायित्व यांवर परिणाम झाल्याची टीका होत आहे. कंत्राटीकरणामुळे बससंख्या वाढली असली तरी सार्वजनिक सेवेमागील आत्मीयता कमी झाल्याचे जाणवते. चालक, कर्मचारी आणि प्रवासी यांच्यातील परस्पर जबाबदारीची भावना कमी होत आहे.

वाढते अपघात, बसथांब्यांवरील अनियमितता आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत निर्माण झालेले प्रश्न यामुळे 'बेस्ट'च्या विश्वासार्ह प्रतिमेला धक्का बसला आहे. यासाठी केवळ प्रशासनालाच दोष देऊन चालणार नाही. सार्वजनिक संपत्ती जपण्याची जबाबदारी नागरिकांचीही आहे. वाहतुकीचे नियम पाळणे, बससेवेचा शिस्तबद्ध वापर करणे आणि सार्वजनिक सुविधांबद्दल आपलेपणाची भावना निर्माण करणे तितकेच आवश्यक आहे. दुसरीकडे प्रशासनानेही दीर्घकालीन नियोजन, आधुनिक तंत्रज्ञान, दर्जेदार देखभाल आणि प्रशिक्षित मनुष्यबळ यावर भर दिला पाहिजे. देशातील अनेक शहरांत मेट्रो, उड्डाणपूल आणि आधुनिक पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत; मात्र दर्जेदार सार्वजनिक बससेवा हीच कोणत्याही शहराची जीवनवाहिनी असते. मुंबईच्या 'बेस्ट'ने एकेकाळी देशासाठी आदर्श निर्माण केला होता. तो वारसा जपण्याऐवजी जर संस्था केवळ अस्तित्व टिकविण्याच्या संघर्षात अडकली, तर ते नागरी व्यवस्थेचे अपयश ठरेल. 'बेस्ट'ची शताब्दी हा केवळ उत्सव नसून आत्मपरीक्षणाचा क्षण आहे.

जुन्या गौरवाची आठवण करून देण्यापेक्षा त्या दर्जाची सेवा पुन्हा उभी करण्यासाठी ठोस प्रयत्न होणे गरजेचे आहे. कारण विकसित शहरांची ओळख केवळ उंच इमारतींनी होत नाही, तर सुरक्षित, विश्वासार्ह आणि नागरिककेंद्रित सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमुळेच ठरते. 'बेस्ट'चा वारसा जपला, तरच मुंबईची ओळख अधिक सक्षम आणि आधुनिक शहर म्हणून कायम राहील.

## ।। अभंगवाणी ।।



देवाच्या प्रसादें करा रे भोजन ।
व्हाल कोण कोण अधिकारी ते ॥१॥

ब्रम्हादिकांसि हें दुर्लभ उच्छिष्ट ।
नका मानूं वीट ब्रम्हरसीं ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ठाकरे-शिंदे पुन्हा एकत्र दिसतील?

## भाजपाच्या मंत्र्यावर शिंदेसेनेचा गंभीर आरोप; बड्या नेत्याचा दावा

**महाईन्यूज । मुंबई**

**आगामी काळात उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे पुन्हा एकत्र दिसतील, असा सनसनाटी दावा बडनेराचे आमदार रवी राणा यांनी केला... मंत्री गिरीश महाजन यांच्या आशीर्वादाने नाशिक महापालिकेत कोट्यवधी रुपयांचे घोटाळे सुरू असल्याचा गंभीर आरोप शिंदेसेनेच्या नगरसेविकेने केला... शिवसेनेच्या (उबाठा) वतीने नागपुरात आयोजित करण्यात आलेल्या रामरक्षा आंदोलनावरून भाजपा आणि ठाकरे गटात राजकीय संघर्ष पेटला.**



अजित पवार यांच्या निधनापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाबाबत चर्चा अंतिम टप्प्यात पोहोचली होती, असा खुलासा खासदार सुनील तटकरेंनी केला... नागपुरात चाललेच आहात, तर संघभूमीवर नाक रगडून आतापर्यंत केलेल्या पापांची माफी मागा, अशी घणाघाती टीका मंत्री नितेश राणे यांनी ठाकरे गटावर केली.

मंत्री गिरीश महाजन यांच्या आशीर्वादाने नाशिक महापालिकेत कोट्यवधी रुपयांचे घोटाळे सुरू असल्याचा गंभीर आरोप शिंदेसेनेच्या नगरसेविका किरण गामणे-दराडे यांनी केला. त्यांच्या या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून जिल्ह्याच्या राजकारणात उलट सूलट चर्चा सुरू झाली आहे. नाशिक महापालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवारी पार पडली. या सभेवेळी नगरसेविका किरण यांनी इंदिरानगर येथील राजसारथी सोसायटीच्या जागेचा टीडीआर घोटाळा हा मंत्री गिरीश महाजन यांच्या आशीर्वादाने झाल्याचा आरोप केला. या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी केली जावी, अशी मागणीही त्यांनी केली. यादरम्यान समितीद्वारे चौकशी करण्याच्या सूचना सभापतींनी दिल्या आहेत. हा प्रस्ताव रीतसर मंजूर करण्यात आल्याचे नगररचना उपसंचालक रितेश चव्हाण यांनी सांगितले आहे. यादरम्यान 'महाजन हे कुंभमेळा मंत्री असून त्यांच्यावर केलेले आरोप तातडीने मागे घ्या, असा आक्रमक पवित्रा भाजपाच्या नगरसेवकांनी घेतला आहे. या घडामोडीकडे सगळ्या जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

अयोध्येतील श्रीराम मंदिरात झालेल्या चोरीच्या निषेधार्थ शिवसेना ठाकरे गटाकडून १८ जुलै रोजी नागपुरात रामरक्षा आंदोलन केले आहे. या आंदोलनावरून भाजपा आणि ठाकरे गटात संघर्ष सुरू झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय माजी आमदार संदीप जोशी यांनी खासदार संजय राऊत यांचा खरपूस समाचार घेतल्यानंतर मत्सव्यवसायमंत्री नितेश राणे यांनी पत्रातून संघभूमीत जाऊन नाक रगडून माफी मागा अशी टीका केली आहे. त्यातच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही उद्धव ठाकरे यांच्यावर तोंडसुख घेतले आहे. द्धव ठाकरेंचे रामरक्षा पठण हा ढोंगीपणा आहे. जनाधार कमी झाल्यानंतर प्रभू श्रीरामाचे नाव घेऊन मतांची बँक निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू असल्याचे बावनकुळे म्हणाले.

### भविष्यात ठाकरे-शिंदे पुन्हा एकत्र दिसतील?

आगामी काळात उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे पुन्हा एकत्र दिसतील, असा सनसनाटी दावा अमरावतीच्या बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार रवी राणा यांनी केला. येत्या १५ दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गटही (अजित पवार-शरद पवार) एकत्र येतील, असेही ते म्हणाले. त्यांच्या या विधानाची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. माध्यमांशी संवाद साधताना रवी राणा म्हणाले की, राजकारणात जे अशक्य वाटते, ते अनेकदा शक्य झालेले आहे. पुढील १५ दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येतील. सुप्रिया सुळे या केंद्रात मंत्री होतील तर सुनेत्रा पवार या राज्य सांभाळतील. उद्धव ठाकरेंनी हनुमान चालिसा वाचनाला विरोध केला होता, त्यामुळे त्यांचे मुख्यमंत्रीपद आणि सरकार गेले. आता मात्र ते रामरक्षा, हनुमान चालिसा वाचत आहेत. १८ जुलै रोजी ते नागपुरात येत आहेत. त्यामुळे माझे त्यांना आवाहन आहे की, त्यांनी नागपूरमधील रेशम बागेत येऊन हेडगेवारांच्या स्मारकाला वंदन करावे. तसेच अमरावतीच्या बजरंग गढीला येऊन हनुमान चालिसाचे वाचन करावे. पुढील काही महिन्यात उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे एकत्र दिसतील, असे भाकितही रवी राणा यांनी केले आहे.

## दोन्ही राष्ट्रवादी विलीनीकरणाच्या चर्चांवर सुप्रिया सुळेंचं मोठं भाष्य

**महाईन्यूज । मुंबई**

**गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात अनेक राजकीय घडामोडी सुरू आहेत. मागील काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विलीनीकरणाच्या चर्चाही सुरू आहेत. यावरून अनेक दावे-प्रतिदावे केले जात आहेत.**



दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते सुनील तटकरे यांनी दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चावरून यू-टर्न घेतला होता. आता याच मुद्यांवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी भाष्य केलं आहे.

दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चांना आता आम्ही पूर्णविराम दिला असल्याचं खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितलं आहे. 'माझ्या भावाची इच्छा दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची होती. पण आता तशी भावना त्या बाजूने येत नसल्यामुळे आम्ही विलीनीकरणाच्या विषयाला पूर्णविराम दिला आहे', असं सुप्रिया सुळे यांनी आज (१७ जुलै) दिल्लीत माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

"राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चांवर आमचे काही नेते सुरुवातीलाच बोलले होते. पण समोरच्यांनी सांगितलं की असं काही झालेलं नाही. त्यामुळे आम्हाला खूप दुःख आणि वेदना झाल्या. एकतर माझा भाऊ गेला, त्यामुळे माझ्या भावाची इच्छा पूर्ण करण्यासाठी आमचे सर्वांचे प्रयत्न होते. कारण दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव माझ्या भावाचा होता. पण आता आम्ही विलीनीकरणाचा विषय संपवलेला आहे. आम्ही स्वाभीमानी लोक आहोत. आता आम्ही विलीनीकरणाच्या विषयाला पूर्णविराम दिलेला आहे", असंही सुप्रिया सुळेंनी सांगितलं आहे.

### सुप्रिया सुळे काय म्हणाल्या?

राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चांवरून सुनील तटकरे यांनी यू-टर्न घेतला. याबाबत पत्रकारांनी सुप्रिया सुळे यांना प्रश्न विचारला. यावर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, "आज माझा भाऊ राहिला नाही. त्यामुळे विलीनीकरणाच्या चर्चांना आम्ही पूर्णविराम दिला आहे. माझा भाऊ जाऊन जवळपास पाच महिने झाले. आम्ही आता कुठे कुटुंब म्हणून सावरतोय. माझ्या भावाची शेवटची इच्छा होती की, दोन्ही पक्ष एकत्र येऊन गुण्यागोविंदाने राज्याची आणि देशाची सेवा करावी. माझ्या भावाची इच्छा पूर्ण करण्याची माझी इच्छा दादा असतानाही होती आणि दादा गेल्यानंतरही होती. मात्र, आता तशी भावना त्या बाजूने येत नाही. त्यामुळे माझ्या मनात आणि आमच्या पक्षात त्या विषयाबाबत आम्ही पूर्णविराम दिला आहे", असं सुप्रिया सुळेंनी म्हटलं आहे.

# जॉर्डनमध्ये अमेरिकी लढाऊ विमानांवर हल्ला

## क्षेपणास्त्र हल्ला केल्याचा इराणचा मोठा दावा, मध्य पूर्वेत पुन्हा खळबळ

**महाईन्यूज | जॉर्डन**

**अमेरिका आणि इराणमधील संघर्ष दिवसेंदिवस वाढत चालल्याचं दिसून येत आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी अमेरिका-इराणमधील शस्त्रसंधी संपुष्टात आल्याची घोषणा केल्यानंतर या संघर्षात पुन्हा एकदा वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. या दोन्ही देशातील तणावामुळे मध्य पूर्वेत पुन्हा एकदा युद्धाचे ढग गडद झाले आहेत.**



तसेच होर्मुझ सामुद्रधुनीत देखील तणाव निर्माण झाला असून याचा फटका जागतिक व्यापाराला बसत असल्याने अनेक देशांवर याचे गंभीर परिणाम होत आहेत. यातच आता आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. जॉर्डनमधील अमेरिकेच्या लढाऊ विमानांना लक्ष्य करत मोठा क्षेपणास्त्र हल्ला केल्याचा दावा इराणने केला आहे. या हल्ल्यात अमेरिकी लढाऊ विमानांचं मोठं नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे.

इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने एक निवेदन जारी केलं आहे. जॉर्डनमध्ये तैनात असलेल्या अमेरिकी लढाऊ विमानांना आणि टँकर्सना लक्ष्य करण्यात आल्याचा दावा इराणने निवेदनात केला आहे. या निवेदनात असंही म्हटलं की, या हल्ल्यात अनेक बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि असंख्य ड्रोन वापरण्यात आले आहेत. तसेच या हल्ल्यात अनेक अमेरिकी टँकर्स आणि अनेक अमेरिकी लढाऊ विमानांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं असल्याचा दावा इराणने केला आहे.

जॉर्डनमधील अमेरिकी लढाऊ विमानांवर क्षेपणास्त्र हल्ला केल्याच्या इराणच्या दाव्यावर अद्याप अमेरिकेकडून कोणतीही प्रतिक्रिया समोर आलेली नाही. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. वृत्तानुसार, इराणने कुवेतमध्ये अनेक ठिकाणी केलेल्या हल्ल्यांमध्ये हाय मोबिलिटी आर्टिलरी रॉकेट सिस्टीम प्लॅटफॉर्म आणि क्षेपणास्त्रे नष्ट केल्याचा दावा इराणकडून करण्यात आला आहे.

दरम्यान, इराणच्या म्हणण्यांनुसार, या ठिकाणी अमेरिकी सैन्य आणि इस्रायल-समर्थित लढाऊ सैनिक तैनात आहेत. इराणच्या हल्ल्यांमध्ये मोठ्या संख्येने अमेरिकेच्या विशेष दलाचे सैनिक मारले गेले आहेत. तसेच प्रत्युत्तरादाखल या कारवाया सुरू असल्याचं इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने एका निवेदनात म्हटलं आहे.

अमेरिकेकडून इराणवर सलग सहाव्या रात्रीही भीषण आणि मोठे हल्ले सुरूच आहेत. दक्षिण इराणमधील बंदर अब्बास येथील वीज प्रकल्प आणि रेल्वे स्टेशन यांसारख्या नागरी पायाभूत सुविधांना या हल्ल्यांत लक्ष्य करण्यात आले. तर दुसरीकडे बहरीन येथील लष्करी तळावर असलेल्या अमेरिकन विमानांना लक्ष्य केल्याचा दावा इराणी लष्कराने केला आहे. कुवेतच्या लष्कराने त्यांच्यावर झालेल्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांना चोख प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे.

### ट्रम्प यांचा चीनवर गंभीर आरोप

अमेरिकेच्या निवडणूक डेटाचा इतिहासातील सर्वात मोठा गैरवापर चीनने केला असल्याचा खळबळजनक आरोप ट्रम्प यांनी केला आहे. एका जाहीर भाषणात, त्यांनी निवडणुकीत हस्तक्षेप आणि हेराफेरी करणाऱ्यांवर गुन्हेगारी खटले चालवण्याचे आदेश फेडरल गव्हर्नमेंटला दिले आहेत. तसेच आपले भाषण प्रसारित करण्यास नकार देणाऱ्या आघाडीच्या टीव्ही नेटवर्कचे ब्रॉडकास्टिंग लायसन्स रद्द करण्याचे निर्देश ट्रम्प यांनी दिले आहेत.

# कुणाल कामराच्या ‘सीता के पती, नीता के पती’ वक्तव्याचा वाद पेटला

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**सोनम वांगचुक यांनी कॉक्रोच जनता पार्टीच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला असून ते या आंदोलनात सहभागी झाले आहेत. सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा २० वा दिवस आहे. सरकारने त्यांच्याशी चर्चा केलेली नाही. मात्र देशभरातून त्यांना पाठिंबा वाढतो आहे. कॉमेडियन कुणाल कामराने सोनम वांगचुक यांची भेट घेतली आणि त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला.**




### अमिता सचदेव यांनी काय म्हटलंय?

कुणाल कामराने खुशाल सरकारवर टीका करावी. त्याबाबत माझा आक्षेप नाही. कुठल्याही विषयावरुन सरकारवर केलेली टीका किंवा केलेलं विधान हे मी समजू शकते. पण देव ही पवित्र भावना आहे. आमच्या देवाचं नाव बदनाम करायचं नाही. देवाचा अनादर आम्ही कधीही खपवून घेणार नाही. त्यामुळेच कुणाल कामराने जाहीर माफी मागितली पाहिजे आणि वक्तव्य सोशल मीडियावरुन हटवलं पाहिजे अशी मागणी आम्ही करत आहोत असं अमिता सचदेव यांनी म्हटलं आहे. एबीपी न्यूजने हे वृत्त दिलं आहे.

तसंच विद्यार्थ्यांच्या आंदोलनालाही पाठिंबा दिला. कॉक्रोच जनता पार्टीच्या मागे देशाने उभं राहिलं पाहिजे असंही तो म्हणाला. मात्र त्याचवेळी त्याने केलेलं एक विधान त्याला भोवलं आहे. ज्यामुळे कुणाल कामराच्या अडचणी वाढल्या आहेत.

माझं विद्यार्थ्यांना सांगणं आहे की तुम्हाला जर कुणी मोदी समर्थक किंवा भाजपाचा मतदार भेटला तर त्याच्याशी अगदी सहजपणे बोला, वाद घालू नका. आपल्याला रोग्याचा नाही तर रोगाचा इलाज करायचा आहे. मोदींनी केलं तर योग्य केलं असं ते म्हणत असतील तर तुमचा वेळ वाया घालवू नका तिथून निघून जा. या सरकारला कुठलीही लाज वाटत नाही. सोनम वांगचुक यांच्या रुपाने आपल्या देशातले आणखी एक गांधी या ठिकाणी उपोषणाला बसले आहेत. गोडसेवादी लोकांना काही फरक पडत नाही, त्यांना कसली चिंताच नाही. तुम्ही विद्यार्थी आहात, काही शेतकरी आहेत, काही बेरोजगार आहेत. मी तुम्हा सगळ्यांच्या वतीने भारताच्या सरन्यायाधीशांचे आभार मानतो कारण त्यांनी हे आंदोलन सुरु करण्यासाठीची पहिली वीट ठेवली. असं म्हणत कुणाल कामराने सरन्यायाधीशांनाही टोला लगावला आहे.

आपल्या याच भाषणात कुणाल कामरा म्हणाला “ये सीता के पती का नाम ले रहें है और नीता के पती का काम कर रहे हैं.” (रामाचं नाव घेता पण काम करता ते मुकेश अंबांनीचं) असं सरकारला उद्देशून कुणाल कामराने म्हटलं होतं. नेमक्या याच वाक्यामुळे कुणाल कामराच्या अडचणींमध्ये भर पडली आहे. कारण सर्वोच्च न्यायालयाच्या एका वकिलाने कुणाल कामराला याच वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी नोटीस धाडली आहे. कुणाल कामराने हा व्हिडीओ डिलिट करावा आणि तातडीने माफी मागावी अशी मागणी यात करण्यात आली आहे. सुप्रीम कोर्टाच्या वकील अमिता सचदेव यांनी ही नोटीस कुणाल कामराला धाडली आहे. कॉमेडियन कुणाल कामरा हा बुधवारी जंतर-मंतर या ठिकाणी गेला होता. त्याने सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. तसंच सीजेपीच्या आंदोलनालाही पाठिंबा दिला आहे. मात्र त्यांचं एक वक्तव्य त्याला भोवल्याची चिन्हं आहेत.



# मी पुरस्कार विकत घेईन

बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्ट पुन्हा एकदा सोशल मीडियावर चर्चेत आली आहे. मात्र यावेळी तिच्या नव्या चित्रपटामुळे नव्हे, तर तिच्या नावाने व्हायरल झालेल्या एका कथित इन्स्टाग्राम स्टोरीमुळे. सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात एक स्क्रीनशॉट शेअर केला जात आहे. या पोस्टमध्ये आलियाने तिच्या 'अल्फा' चित्रपटावर टीका करणाऱ्यांना उद्देशून वादग्रस्त विधान केल्याचा दावा करण्यात आला. मात्र, उपलब्ध माहितीनुसार हा स्क्रीनशॉट बनावट असून आलियाने अशी कोणतीही पोस्ट केलेली नाही. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या 'अल्फा' या चित्रपटात आलिया भट्ट आणि शर्वरी वाघ प्रमुख भूमिकेत दिसल्या. चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता होती आणि त्याचे जोरदार प्रमोशनही करण्यात आले होते. मात्र, प्रदर्शनानंतर चित्रपटाला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. बॉक्स ऑफिसवरही चित्रपटाची कामगिरी अपेक्षेपेक्षा कमी राहिली. त्यानंतर सोशल मीडियावर आलिया भट्टला ट्रोल केले जाऊ लागले. याचदरम्यान आलियाच्या नावाने एक कथित इन्स्टाग्राम स्टोरी व्हायरल झाली. या स्क्रीनशॉटमध्ये, "माझ्या चित्रपटाला फ्लॉप म्हणणाऱ्यांनो, मी काहीही न करता पुरस्कार विकत घेईन. माझ्या पाठीशी करण जोहर आहेत. माझं कोणीही काही बिघडवू शकत नाही. 'तुम्बाड 2' देखील मला मिळाला आहे," असे लिहिल्याचा दावा करण्यात आला. ही पोस्ट व्हायरल होताच सोशल मीडियावर मोठी चर्चा रंगली. अनेकांनी ही पोस्ट खरी समजून आलियावर टीका केली. काहींनी तिच्यावर अहंकारी असल्याचा आरोप केला, तर काहींनी पुरस्कारांबाबत केलेल्या कथित वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली. मात्र काही युजर्सनी या स्क्रीनशॉटच्या सत्यतेवर सुरुवातीपासूनच प्रश्न उपस्थित केले.






# मला अनेक वर्षे माझाच आजार समजला नाही

शाहरुख खानच्या 'कुछ कुछ होता है' सिनेमातून बालकलाकार म्हणून लोकप्रिय झालेली आणि 'स्टुडंट ऑफ द इयर'मध्येही झळकलेली अभिनेत्री सना सईद (Sana Saeed) चर्चेत आली आहे. तिने आयुष्यातील अत्यंत कठीण संघर्षाबद्दल पहिल्यांदाच मोकळेपणाने भाष्य केले आहे. अनेक वर्षे ती 'बुलिमिया' (Bulimia) या गंभीर खाण्याच्या आजाराशी झुंज देत होती, असा धक्कादायक खुलासा तिने केला आहे. इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या एका व्हिडिओमध्ये सनाने सांगितले की, लहानपणापासूनच तिला खाण्याबाबत भीती आणि अस्वस्थता जाणवत होती. "मला नेहमी लपूनछपून खावं लागायचं. कुणी माझ्या खोलीत येईल आणि मी खूप खात आहे, असं त्यांना वाटेल या भीतीत मी जगत होते," असे तिने सांगितले. सनाने पुढे सांगितले की, 'द बुलिमिया हेल्प मेथड' हे पुस्तक वाचल्यानंतरच तिला आपल्या समस्येचं खरं स्वरूप समजलं. "वर्षानुवर्षे मला वाटत होतं की माझ्यातच काहीतरी चूक आहे. पण जेव्हा या आजाराबद्दल वाचलं, तेव्हा माझ्यासोबत नेमकं काय घडत आहे, याची जाणीव झाली," असा खुलासा अभिनेत्रीने केला. तिच्यासाठी सर्वात कठीण गोष्ट म्हणजे स्वतःला बुलिमिया असल्याचं स्वीकारणं होतं. अभिनेत्री म्हणाली "खाण्याचा आजारा आहे, हे मान्य करणंही कठीण होतं. लहानपणी या आजाराबद्दल कधीच ऐकलं नव्हतं. जर त्यावेळी याबद्दल माहिती असती, तर माझी समस्या मला खूप आधी समजली असती," असेही सनाने स्पष्ट केले.

# प्रत्येक मैत्रीचं नातं प्रेमप्रकरण नसतं



टीव्ही अभिनेता अर्जुन बिजलानी आणि अभिनेत्री मौनी रॉय (Mouni Roy ) यांच्या नात्याबाबत गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर विविध चर्चा सुरू होत्या. दोघांचे नाव एकमेकांशी जोडले जात असल्याने अनेक अफवा पसरल्या. अखेर या चर्चांवर अर्जुन बिजलानीच्या टीमने अधिकृत निवेदन जारी करत सर्व अफवा फेटाळून लावल्या आहेत. दोघांमध्ये केवळ अनेक वर्षांची घट्ट मैत्री असून त्याला प्रेमसंबंधांचे स्वरूप देणे चुकीचे असल्याचे या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. अलीकडच्या काळात सोशल मीडियावर अर्जुन बिजलानी आणि मौनी रॉय यांच्यात प्रेमसंबंध असल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. काही मीडिया रिपोर्ट्समध्येही अशा प्रकारचे दावे करण्यात आले. या अफवांमुळे दोघांच्या चाहत्यांमध्येही संभ्रम निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर अर्जुन बिजलानीच्या टीमने अधिकृत निवेदन प्रसिद्ध केले. त्यामध्ये म्हटले आहे, "अर्जुन बिजलानी आणि मौनी रॉय यांच्याबाबत पसरवल्या जात असलेल्या अफवा पूर्णपणे निराधार आहेत. प्रत्येक मैत्रीचा रोमँटिक अर्थ काढणे किंवा तिला प्रेमप्रकरणाचे नाव देणे चुकीचे आहे. दोघे अनेक वर्षांपासून अतिशय चांगले मित्र आहेत आणि त्यांच्यात विश्वासाचे नाते आहे. अशा बनावट बातम्यांमुळे कलाकारांच्या वैयक्तिक आयुष्यावर परिणाम होतो." अर्जुन आणि मौनी यांची मैत्री आजची नाही. एकता कपूर यांच्या लोकप्रिय 'नागिन' मालिकेत दोघांनी प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. मालिकेत ऋतिक आणि शिवन्या या भूमिकांमधील त्यांची ऑनस्क्रीन केमिस्ट्री प्रेक्षकांना खूप आवडली होती. त्यानंतरही दोघांची मैत्री कायम राहिली. अनेक कार्यक्रम, पार्ट्या आणि कौटुंबिक समारंभांमध्ये ते एकत्र दिसत आले आहेत.



# रोहित शर्मा निवृत्ती घेणार?

## लॉर्ड्सवरील वनडे हिटमॅनच्या कारकिर्दीतील ठरू शकतो अखेरचा सामना

**महाईन्यूज । लंडन**

**भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरु आहे. टी-२० मालिका ४- ० ने गमावल्यानंतर भारतीय संघाने वनडे मालिकेत दमदार पुनरागमन केलं. पहिला सामना जिंकून भारतीय संघाने या मालिकेत १-० ने आघाडी घेतली. पण त्यानंतर झालेल्या दुसऱ्या वनडे सामन्यात भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. यासह ही मालिका १-१ ने बरोबरीत आली आहे. मालिकेतील तिसरा सामना हा लॉर्ड्सच्या मैदानावर खेळवला जाणार आहे. हा सामना दोन्ही संघांसाठी निर्णायक असणार आहे. हा सामना आणखी एका कारणामुळे खास ठरणार आहे. ते म्हणजे हा रोहित शर्माच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील शेवटचा सामना असू शकतो. पण याबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. यादरम्यान रोहितचे आई – वडील लंडनमध्ये दाखल झाल्याने या चर्चांना अधिक उधाण आले आहे.**




भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरु आहे. टी-२० मालिका ४- ० ने गमावल्यानंतर भारतीय संघाने वनडे मालिकेत दमदार पुनरागमन केलं. पहिला सामना जिंकून भारतीय संघाने या मालिकेत १-० ने आघाडी घेतली. पण त्यानंतर झालेल्या दुसऱ्या वनडे सामन्यात भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. यासह ही मालिका १-१ ने बरोबरीत आली आहे. मालिकेतील तिसरा सामना हा लॉर्ड्सच्या मैदानावर खेळवला जाणार आहे. हा सामना दोन्ही संघांसाठी निर्णायक असणार आहे. हा सामना आणखी एका कारणामुळे खास ठरणार आहे. ते म्हणजे हा रोहित शर्माच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील शेवटचा सामना असू शकतो. पण याबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. यादरम्यान रोहितचे आई – वडील लंडनमध्ये दाखल झाल्याने या चर्चांना अधिक उधाण आले आहे.

CREX च्या वृत्तानुसार, रोहित शर्माच्या निवृत्तीची चर्चा सुरु असताना त्याचे आई – वडील तिसरा वनडे सामना पाहण्यासाठी लंडनमध्ये दाखल झाले आहेत. इतरवेळी रोहितचे आई – वडील सामना पाहण्यासाठी मैदानात येत नाहीत. याआधी टी-२० वर्ल्डकप २०२४ स्पर्धेतील विजयाच्या जल्लोषादरम्यान रोहितच्या आई – वडिलांना वानखेडे स्टेडियमवर हजेरी लावली होती. त्यानंतर वानखेडे स्टेडियमवर रोहित शर्माच्या स्टँडच्या ओपनिंगदरम्यान देखील त्याच्या आई – वडिलांनी हजेरी लावली होती. आता रोहितला शेवटच्या सामन्यात खेळताना पाहण्यासाठी त्याचे आई – वडील लंडनमध्ये दाखल झाल्याची चर्चा रंगली आहे. लॉर्ड्सच्या मैदानावरील सामना हा त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील शेवटचा सामना असणार, याची कल्पना त्यांना आधीपासूनच होती, असं म्हटलं जात आहे.

रोहित शर्मा फलंदाजीत हवी तशी कामगिरी करु शकलेला नाही. इंग्लंडविरुद्ध सुरु असलेल्या वनडे मालिकेतील पहिल्या सामन्यात तो अवघ्या ११ धावा करुन माघारी परतला होता. त्यानंतर दुसऱ्या सामन्यात त्याला अवघ्या २६ धावा करता आल्या आहेत. यादरम्यान त्याने १ चौकार आणि १ षटकार खेचला. तो केवळ याच मालिकेत फ्लॉप ठरलेला नाही. याआधी झालेल्या ८ सामन्यांमध्ये त्याला अवघ्या ३३ च्या सरासरीने २४१ धावा करता आल्या आहेत. यादरम्यान त्याने ८८.६ च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या आहेत. रोहित जलदगतीने धावा करण्यासाठी ओळखला जातो. पण त्याचा हा स्ट्राइक आता रेट त्याच्या निवृत्तीचं कारण बनला आहे.

## भारताला U-19 वर्ल्डकप जिंकून देणाऱ्या खेळाडूला श्रीलंकेत अटक

**महाईन्यूज । न्यूयॉर्क**

**श्रीलंकेत आजपासून लंका प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेचा थरार सुरु होणार आहे. या स्पर्धेतील पहिला सामना जाफना किंग्स आणि गॉल मार्व्हल्स या दोन्ही संघांमध्ये खेळवला जाणार आहे. हा सामना कोलंबोतील सिंहलीज स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर खेळवला जाणार आहे. या सलामीच्या सामन्याआधी मोठी बातमी समोर येत आहे.**




भारताच्या अंडर १९ संघाचं प्रतिनिधित्व केलेला खेळाडू आणि जाफना किंग्स संघाचा सह संघमालक असलेला मनजोत कालरा याला श्रीलंकेच्या पोलिसांनी अटक केली आहे. मनजोत कालरावर एका खेळाडूला लाच देण्याचा आणि मॅच फिक्सिंग करण्याचा आरोप आहे. या आरोपावरुन श्रीलंकेच्या क्रीडा भ्रष्टाचारविरोधी पथकाने तातडीने कारवाई करत त्याला अटक केली आहे.

भारतीय संघाने २०१८ मध्ये झालेल्या अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धेत फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाला हरवून जेतेपदाचा मान पटकावला होता. या सामन्यात मनजोत कालराने दमदार शतकी खेळी केली होती. या शतकी खेळीनंतर तो प्रकाशझोतात आला. दरम्यान २०२६ च्या सुरुवातीलाच त्याने लंका प्रीमियर लीग स्पर्धेत संघ खरेदी करण्यासाठी गुंतवणूक केली. तो जाफना किंग्स संघाचा सह संघमालक आहे. श्रीलंकेच्या पोलिसांनी असा आरोप केला आहे की, कालराने एका खेळाडूला पैसे देऊन मॅच फिक्स करण्याचा प्रयत्न केला. तपासानंतर समोर आलेल्या माहितीनुसार, मनजोत कालराने स्पर्धा सुरु होण्याच्या १० दिवसांआधीच खेळाडूला संपर्क केला होता. संबंधित खेळाडूने ही बाब अधिकाऱ्यांना कळवल्यानंतर तपास करण्यात आला. त्यानंतर शुक्रवारी पोलिसांनी मनजोत कालराला अटक केली आहे.

श्रीलंका क्रिकेट बोर्डाने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, लंका प्रीमियर लीग स्पर्धा नियोजित वेळेतच सुरु होणार. जर तपास पथकाला तपासादरम्यान कुठलीही गरज लागली, तर श्रीलंका क्रिकेट बोर्ड मदतीसाठी तयार असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

। शनिवार ।

दि. 18 जून 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पवना धरण वेगाने भरतेय; पाणीविसर्गाची चाहूल

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

मावळ तालुक्यात पावसाने काहीशी विश्रांती घेतली असली, तरी मागील काही दिवसांतील मुसळधार पावसामुळे पवना धरणातील पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत आहे. गुरुवार (१६ जुलै) सायंकाळी सहा वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार धरणात ७५.९७ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला असून, एकूण पाणीसाठा ७६.४८ टक्क्यांवर पोहोचला आहे. पुढील एक-दोन दिवसांत पुन्हा जोरदार पाऊस झाल्यास धरणातून पाणीविसर्ग करण्याची शक्यता वाढणार आहे.

सध्या धरणाची पाणीपातळी ६१०.६० मीटर (२००३.०८ फूट) इतकी झाली असून, धरणात २१५.४८ दशलक्ष घनमीटर (७६११.५० दशलक्ष घनफूट) पाणीसाठा आहे. त्यापैकी १८४.३४ दशलक्ष घनमीटर उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे.


गेल्या २४ तासांत धरण परिसरात २२ मि.मी. पावसाची नोंद झाली असून, यंदाच्या पावसाळ्यात आतापर्यंत १५२१ मि.मी. पाऊस झाला आहे. पावसाचा वेग कमी झाला असला तरी धरणातील पाणीसाठा वाढतच असल्याने प्रशासनाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

दरम्यान, सध्या धरणातून एकही क्युसेक पाणी सोडण्यात आलेले नाही. जलविद्युत प्रकल्पासाठी तसेच सांडव्याद्वारे होणारा विसर्ग पूर्णपणे बंद असून, पवना नदीपात्रातील पाणीपातळी स्थिर आहे.

धरणातील पाणीसाठा आणखी वाढल्यास गरजेनुसार सांडव्याद्वारे पाणी सोडण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो. त्यामुळे नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी धरण प्रशासन व जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना आणि इशाऱ्यांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिकृत पाणीविसर्ग सुरू झाल्यास त्याची माहिती प्रशासनाकडून तत्काळ जाहीर करण्यात येणार आहे.

### नदीकाठच्या नागरिकांसाठी इशारा

पवना धरणातील पाणीसाठा सातत्याने वाढत असून, पुढील एक-दोन दिवसांत मुसळधार पाऊस झाल्यास सांडव्याद्वारे पाणी सोडण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो. त्यामुळे नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी प्रशासनाकडून दिल्या जाणाऱ्या सूचना आणि इशाऱ्यांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY AKURDI PUNE

Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026



*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

**UG/PG Programs**

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on

CONTACT | Phone Number: 8600091180 | Website: dypiu.ac.in | Email: admission@dypiu.ac.in

APPLY NOW

D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# हिंदूभूषण स्मारक परिसरात विद्यार्थ्यांकडून वृक्षारोपण

## वसुंधरा संवर्धनासाठी इंटेलिजंट कॅडेट इंटरनॅशनल स्कूलचा पुढाकार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**हिंदूभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड, पुणे यांच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. इंटेलिजंट कॅडेट इंटरनॅशनल स्कूल, इंद्रायणी नगर, भोसरी यांच्या वतीने आयोजित या उपक्रमात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.**




हिंदूभूषण स्मारक ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून उभारण्यात आलेले हे स्मारक शहराच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक अस्मितेचे प्रतीक मानले जाते. या स्मारकाच्या परिसरात वृक्षारोपण करून परिसर अधिक हरित आणि पर्यावरणपूरक करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

स्मारकाच्या मागील बाजूस आयोजित कार्यक्रमात पिंपळ, वड, चिक्कू, पेरू, कडुलिंब आदी वृक्षांची लागवड करण्यात आली. "झाडे लावा, झाडे जगवा – पर्यावरण वाचवा!" हा संदेश देत विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

कार्यक्रमास हिंदूभूषण स्मारक ट्रस्टचे उपाध्यक्ष गणेश भुजबळ, ट्रस्ट सदस्य इंद्रजित भोसले, प्रसाद वायकर, समन्वयक गणेश गुरव, सहकारी ओमकार तसेच शाळेच्या प्राचार्या शिबी राजू आणि शिक्षकवर्ग उपस्थित होता.

वाढते प्रदूषण आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर वृक्षसंवर्धन ही काळाची गरज बनली आहे. हिंदूभूषण स्मारक परिसरात झालेल्या या उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षणासोबतच सामाजिक बांधिलकीचा संदेशही समाजापर्यंत पोहोचल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. ट्रस्टच्या वतीने यावेळी विद्यार्थ्यांना पाणी बॉटल आणि शिक्षकांना पेन भेट देण्यात आली.

> "हिंदूभूषण स्मारक हे केवळ ऐतिहासिक अस्मितेचे प्रतीक नसून, सामाजिक आणि पर्यावरणीय बांधिलकी जपणारे प्रेरणास्थान आहे. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून उभारलेल्या या परिसरात वृक्षारोपण करून भावी पिढीसाठी हरित वारसा निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून ते जगविण्याचा संकल्प केला, तर पर्यावरण संवर्धनाची मोठी चळवळ उभी राहू शकते.
>
> **- गणेश भुजबळ, उपाध्यक्ष, हिंदूभूषण स्मारक ट्रस्ट.**



## केअरटेकरकडून २.२२ लाखांची चोरी; आरोपी अटकेत

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

पिंपळे सौदागर येथील डॅफोडाईल्स हाऊसिंग सोसायटीतील एका फ्लॅटमधून सुमारे ₹२.२२ लाखांचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरी केल्याप्रकरणी सांगवी पोलिसांनी केअरटेकरला अटक केली आहे.

सांगवी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्च २०२६ ते १९ जून २०२६ या कालावधीत पिंपळे सौदागर येथील डॅफोडाईल्स हाऊसिंग सोसायटीतील फ्लॅटमध्ये ही चोरी झाली.

या प्रकरणी महिलेने फिर्याद दिली असून, घरात केअरटेकर म्हणून काम करणारा पारस यादव (वय ३०, रा. रहाटणी) याने विश्वासाचा गैरफायदा घेत ₹२.२२ लाख किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम मालकाच्या संमतीशिवाय स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी चोरल्याचा आरोप आहे.

सांगवी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पाटील करत आहेत.

## पुनावळेतील सर्व्हिस रोडचे तातडीने सिमेंट काँक्रीटीकरण करा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुनावळे अंडरपास ते पवना नदीकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गालगतच्या उजव्या व डाव्या बाजूच्या सर्व्हिस रोडचे तातडीने सिमेंट काँक्रीटीकरण करण्यात यावे, अशी मागणी भाजप पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) उपाध्यक्ष नवनाथ मारुती ढवळे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे (NHAI) केली आहे.**




यासंदर्भात कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोथरूड, पुणे यांना निवेदन देण्यात आले आहे. गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे पुनावळे अंडरपास ते पवना नदीकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडवर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडले असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे वाहतूक कोंडीची समस्या वाढली असून, दुचाकी व चारचाकी वाहनांच्या अपघातांच्या घटनांमध्येही वाढ होत आहे. विशेषतः परिसरातील नागरिक, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि दररोज या मार्गाचा वापर करणाऱ्या हजारो वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

पावसाचा जोर कमी झाल्यानंतर या दोन्ही सर्व्हिस रोडचे डांबरीकरण न करता कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून सिमेंट काँक्रीटीकरण करण्यात यावे आणि ही कामे युद्धपातळीवर हाती घेऊन लवकरात लवकर पूर्ण करावीत, अशी मागणी नवनाथ ढवळे यांनी केली आहे.

दरम्यान, या निवेदनाची प्रत आमदार शंकर जगताप यांनाही पाठविण्यात आली असून, संबंधित यंत्रणांनी नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तातडीने कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

> "पुनावळे परिसरातील सर्व्हिस रोडची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. दररोज हजारो नागरिक या मार्गाचा वापर करतात. त्यामुळे तात्पुरत्या डागडुजीऐवजी सिमेंट काँक्रीटीकरणासारखा कायमस्वरूपी उपाय करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या सुरक्षेशी तडजोड होऊ नये, हीच आमची भूमिका आहे.
>
> **– नवनाथ ढवळे, उपाध्यक्ष, भाजप पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा).**

# प्रतिभा कॉलेजमध्ये 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' क्लबची स्थापना

## क्विक हील फाउंडेशनसोबत सामंजस्य करार, विद्यार्थी करणार सायबर जनजागृती

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती आणि विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा बाबत जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशाने चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचालित प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्यूटर स्टडीज आणि क्विक हील फाउंडेशन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत महाविद्यालयात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' क्लबची स्थापना करण्यात आली आहे.**



या उपक्रमासाठी संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांचे प्रोत्साहन व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी यांचे सहकार्य लाभले आहे.

डॉ. हर्षिता वाच्छानी यांच्या मार्गदर्शनाखाली या क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये तसेच समाजामध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी विविध ठिकाणी कार्यशाळा, परिसंवाद, जनजागृती मोहिमा आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी महाविद्यालयातील उत्साही, जबाबदार व नेतृत्वगुण असलेल्या विद्यार्थ्यांची क्लब ऑफिसर्स म्हणून निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून नागरिकांना सुरक्षित डिजिटल व्यवहार, ऑनलाइन फसवणुकीपासून संरक्षण, सायबर गुन्ह्यांबाबत जागरूकता तसेच सायबर सुरक्षेचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

क्लब ऑफिसर्सचा पदग्रहण सोहळा नुकताच क्विक हील फाउंडेशनच्या पुणे येथील कार्यालयात उत्साहात पार पडला. यावेळी क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती अनुपमा काटकर, फाउंडेशनचे असोसिएट डायरेक्टर अजय शिर्के, सीएसआर एक्झिक्युटिव्ह गायत्री पवार-केसकर तसेच दिपू सिंह यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षेचे महत्त्व, डिजिटल सुरक्षितता, सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण आणि जनजागृती उपक्रमाची अंमलबजावणी करण्याविषयी सखोल माहिती, मार्गदर्शन आणि आवश्यक प्रशिक्षण दिले.

डॉ. हर्षिता वाच्छानी या शिक्षक समन्वयक म्हणून कार्य पाहणार असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी संपूर्ण शैक्षणिक वर्षभर विविध सायबर जनजागृती उपक्रम राबविणार आहेत.

संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भुपाली शहा, संचालिका डॉ. तेजल शहा, प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, उपप्राचार्या डॉ. जयश्री मुळे तसेच मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया यांनी निवड झालेल्या सर्व क्लब ऑफिसर्सचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### नवीन पदाधिकारी

'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' क्लबसाठी महाविद्यालयातील विद्यार्थिनी स्नेहा तेली यांची अध्यक्षपदी, पियुषा रोहम यांची सचिवपदी, साकीब चौधरी यांची उपक्रम प्रमुख म्हणून तर सिमरन यादव यांची मीडिया प्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे.

# केमिकल इंजिनिअरिंगमध्ये करिअरच्या अमर्याद संधी

**केमिकल इंजिनिअरिंग ही जीवनाशी सर्वाधिक निगडित असलेली अभियांत्रिकी शाखा आहे. आपल्या दैनंदिन वापरातील असंख्य वस्तूंच्या निर्मितीमध्ये केमिकल इंजिनिअरचे महत्त्वपूर्ण योगदान असते. म्हणूनच ही शाखा विद्यार्थ्यांसाठी रोजगार, उच्च शिक्षण, संशोधन, उद्योजकता आणि परदेशातील करिअरच्या दृष्टीने अत्यंत आशादायी मानली जाते.**



**डॉ. के. टी. जाधव**
DY Patil College of Engineering & Technology, Kolhapur

ट्रोलियम, रिफायनरी, पेट्रोकेमिकल्स, पॉलिमर, प्लास्टिक, फार्मास्युटिकल्स, जैवतंत्रज्ञान, अन्नप्रक्रिया, खते, कीटकनाशके, ऊर्जा, पर्यावरण, मटेरियल सायन्स, वस्त्रोद्योग, कागद, रबर, रंग, सौंदर्यप्रसाधने आणि सिमेंट अशा अनेक उद्योगांमध्ये केमिकल इंजिनिअरिंगचे महत्त्व आहे.

आपल्या दैनंदिन जीवनातील औषधे, साबण, डिटर्जंट, टूथपेस्ट, खाद्यतेल, साखर, पेट्रोल, डिझेल, एलपीजी गॅस, अल्कोहोल, पेंट्स, प्लास्टिकच्या वस्तू, फायबर, कागद, सौंदर्यप्रसाधने, खते आणि विविध रासायनिक उत्पादने तयार करण्यामागे केमिकल इंजिनिअर्सचे ज्ञान आणि कौशल्य कार्यरत असते.

**उद्योगांमध्ये व्यापक रोजगारसंधी**

केमिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना विविध उद्योगांमध्ये काम करण्याची संधी मिळते. केमिकल इंजिनिअर केवळ रासायनिक उद्योगातच काम करतो, हा समज चुकीचा आहे. प्रत्यक्षात त्याच्यासाठी पुढील क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध

**केमिकल इंजिनिअरिंगमध्ये करिअरच्या अमर्याद संधी**

केमिकल इंजिनिअरचे काम केवळ रसायन तयार करण्यापुरते मर्यादित नसते. प्रयोगशाळेत विकसित केलेल्या प्रक्रियेचे मोठ्या औद्योगिक स्तरावर रूपांतर करणे, उत्पादनाचा खर्च कमी करणे, गुणवत्तेत सुधारणा करणे, ऊर्जेची बचत करणे आणि प्रक्रिया सुरक्षित व पर्यावरणपूरक बनविणे ही त्याची प्रमुख जबाबदारी असते.

**देश-विदेशात वाढती मागणी**

भारतात औद्योगिकीकरणाचा वेग वाढत असल्यामुळे केमिकल इंजिनिअर्सची मागणी सातत्याने वाढत आहे. पेट्रोलियम, फार्मास्युटिकल्स, ऊर्जा, अन्नप्रक्रिया, पर्यावरण आणि विशेष रसायन उद्योगांच्या विस्तारामुळे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत.

भारताबरोबरच अमेरिका, युरोप, UAE, Middle East Countries, मध्यपूर्व, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया आणि इतर विकसित देशांमध्येही केमिकल इंजिनिअर्सना मोठी मागणी आहे. तेलउत्पादक देशांमध्ये रिफायनरी, पेट्रोकेमिकल आणि नैसर्गिक वायू उद्योगात आकर्षक वेतनासह रोजगार उपलब्ध होतो.

**संशोधन आणि नवतंत्रज्ञान**

आज जगासमोर ऊर्जा संकट, हवामान बदल, प्रदूषण, पाणीटंचाई, अन्नसुरक्षा आणि कचरा व्यवस्थापन यांसारखी गंभीर आव्हाने आहेत. या समस्यांवर प्रभावी उपाय शोधण्यात केमिकल इंजिनिअरिंगची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. हरित हायड्रोजन, जैवइंधन, बायोडिझेल, इथेनॉल, सौरऊर्जा, बॅटरी तंत्रज्ञान, कार्बन कॅप्चर, कचऱ्यापासून ऊर्जा, पाणी पुनर्वापर आणि पर्यावरणपूरक उत्पादन प्रक्रिया जवळचा संबंध आहे. खते, जैवखते, कीटकनाशके, अन्नप्रक्रिया, शीतसाखळी, शेतीमालाचे मूल्यवर्धन आणि कृषी-आधारित उद्योगांमध्ये केमिकल इंजिनिअर्सची भूमिका मोठी आहे.

सुरू आहे. नॅनोतंत्रज्ञान, बायोकेमिकल इंजिनिअरिंग, बायोमेडिकल तंत्रज्ञान, औषध वितरण प्रणाली, आधुनिक मटेरियल आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा औद्योगिक प्रक्रियांमध्ये वापर यांमुळे या शाखेला भविष्यकाळात आणखी महत्त्व प्राप्त होणार आहे.

कृषी क्षेत्रासाठी उपयुक्त शाखा भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे केमिकल इंजिनिअरिंगचा कृषी कृषी विकासाशीही विकासाशीही शेतमालापासून इथेनॉल, जैवइंधन, स्टार्च, सेंद्रिय उत्पादने आणि प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ तयार करून शेतकऱ्यांचे उत्पन्न ग्रामीण भागात लघुउद्योग आणि कृषी-आधारित उद्योग उभारण्यासाठीही या शाखेचे ज्ञान उपयोगी ठरते.

**या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर संशोधन**

उच्च शिक्षण आणि स्वयंरोजगार पदवी पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी केमिकल इंजिनिअरिंग, पेट्रोकेमिकल्स, पॉलिमर, पर्यावरण, ऊर्जा, जैवतंत्रज्ञान, मटेरियल सायन्स, औद्योगिक सुरक्षा आणि प्रक्रिया रचना या क्षेत्रांमध्ये एम.टेक., एम.ई., एम.एस. किंवा पीएच.डी. करू शकतात. आयआयटी, आयसीटी, एनआयटी, आयआयएससी, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा आणि विविध संशोधन संस्थांमध्ये उच्च शिक्षण व संशोधनाच्या उत्तम

**केमिकल इंजिनिअर्स पुढील पदांवर कार्य करू शकतात :**

प्रोसेस इंजिनिअर
प्रॉडक्शन इंजिनिअर
प्रोजेक्ट इंजिनिअर
डिझाइन इंजिनिअर
सेफ्टी इंजिनिअर
एन्व्हायर्नमेंटल इंजिनिअर
ऑपरेशन आणि मेंटेनन्स इंजिनिअर संधी उपलब्ध आहेत.

या शाखेत स्वयंरोजगाराच्याही मोठ्या संधी आहेत. साबण, डिटर्जेंट, फिनाइल, सौंदर्यप्रसाधने, पाणीशुद्धीकरण रसायने, खाद्यप्रक्रिया उत्पादने, जैवखते, रंग, क्लिनिंग उत्पादने आणि विविध लघुरासायनिक उद्योग सुरू करता येतात.

**उज्ज्वल भविष्याची शाखा**

उद्योग, ऊर्जा, आरोग्य, शेती, पर्यावरण आणि दैनंदिन जीवनातील उत्पादनांची गरज जोपर्यंत आहे, तोपर्यंत केमिकल इंजिनिअर्सची मागणी कायम राहणार आहे. नवतंत्रज्ञान, शाश्वत विकास आणि पर्यावरणपूरक उत्पादन प्रक्रियांमुळे या शाखेचे महत्त्व भविष्यकाळात अधिक वाढणार आहे.

विज्ञान आणि गणिताची आवड, संशोधनाची वृत्ती, समस्यांचे विश्लेषण करण्याची क्षमता, कल्पकता आणि उद्योगक्षेत्रात काम करण्याची तयारी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी केमिकल इंजिनिअरिंग ही अमर्याद संधी देणारी सदाहरित आणि भविष्याभिमुख शाखा आहे.




Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station